**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्र.रारसे-२०११/प्र.क्र. ३३१/आरोग्य-५

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ६ जानेवारी, २०१२.

**प्रस्तावना :**

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.४ जानेवारी, १९९६ रोजी रिट पिटीशन (सिव्हील क्र.९१/१९९२) संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार देशपातळीवर राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद व संपूर्ण देशात प्रत्येक राज्यामध्ये एक राज्य रक्त संक्रमण परिषद स्थापन करण्याबाबत निर्णय दिला होता. या निर्णयास अनुसरुन राज्यातही राज्य रक्त संक्रमण परिषद दि. २ जुलै, १९९६ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली असून, या परिषदेची नोंदणी, संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली मा.धर्मादाय आयुक्तांकडे दि. २२.१.१९९७ मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार या परिषदेचे कामकाज सुरु असून, प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा रुग्णालयांमध्ये रक्त पेढी कार्यरत आहे. तसेच मुंबईमध्ये सर ज.जी.समूह रुग्णालय येथे मुंबई येथे एक मेट्रो रक्तपेढी कार्यरत आहे. राज्यात रुग्णांना सहजतेने आवश्यक रक्त तसेच रक्तघटक उपलब्ध व्हावेत, आणि त्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना रक्त अथवा रक्तघटक उपलब्ध करुन घेण्यासाठी अडचणींना तोंड द्यावे लागू नये, त्याचप्रमाणे राज्यातील जनतेच्या जनहितार्थ व आपत्ती व्यवस्थापनाच्यादृष्टीने राज्यात १० (दहा) ठिकाणी मेट्रो रक्तपेढी स्थापन करण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्यातील जनतेच्या हितासाठी तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्यादृष्टीने राज्यात ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती, परभणी, जळगाव, अहमदनगर, सातारा, चंद्रपूर व पुणे या दहा ठिकाणी मेट्रो रक्तपेढी स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

या मेट्रो रक्तपेढी स्थापन करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतुद यथावकाश करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(नं. ग. तडवी)**

कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन

प्रत,

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई

संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.

उपसंचालक, आरोग्य सेवा , ( सर्व मंडळे)

जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

[illegible]

जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ /२ ( लेखापरिक्षा)/ ( लेखा व अनुज्ञेयता ) , मुंबई, नागपूर.
जिल्हा लेखा व अधिदान अधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
निवड नस्ती ( आरोग्य -५).